**आर.सी.सी.क्रं.६७१/२०१९**

**नि. क्रमांक ४०.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- गोपीनाथ अर्जून उघडे,

वय सुमारे :- ३५ वर्षे, व्यवसाय :- चालक,

नेमणुक. :- चांदखेड, ता. मावळ , जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस. एस. पवार यांच्यामार्फत.**

०१. दि. २१/०८/२०१९ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी चांदखेड येथील बारमुख यांच्या शेतामध्ये बोलावले होते. पंचनामा करण्यासाठी पोलीस तसेच खबरी व त्यांच्या घरातील लोक हजर होते. गुन्हयाचे ठिकाण हे खबरीच्या घरातील लोकांनी दाखवले होते. घटनास्थळावर भुईमुगाचे शेत होते. घटनास्थळावर विटभट्टीची माती देखील होती. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. पंचनामा हा सकाळी ९ वाजता सुरु करुन १० वाजता समाप्त करण्यात आला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि क्र. ४१/क** देण्यात येतो. घटनास्थळ पंचनाम्यासाठी माझ्यासोबत दुसरे पंच पुनम जगताप हे हजर होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. अक्षय रौंधळ यांच्या तर्फे शपथेवर सुरु.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ मध्ये मी माळी यांच्या खोलीमध्ये राहण्यास होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी माळी यांच्या गाडीवरती चालक म्हणून नोकरी करत होतो. दि. २१/०८/२०१९ रोजी मला पंचनाम्यासाठी पोलीसांनी बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, माळी यांनी मला पंचनाम्याला जाण्याचे कळवले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा पोलीसांनी तयार केला व त्यांच्या सांगण्याप्रमाणे

मी पंचनाम्यावर सहया केल्या. पोलीसांनी घटनास्थळावरुन कोणतीही वस्तू जप्त केली नव्हती. पोलीसांनी काय पंचनामा केला होता हे मला माहित नाही. पोलीसांनी पंचनाम्यामध्ये काय लिहीले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx

**दिनांक. ०६/०८/२०२६.**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडगाव,**

**ता.मावळ, जि. पुणे.**